महानगरपालिकांच्या अधिनियमांच्या कलम ४५१
मधील तरतूदीनुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांक:- संकिर्ण २०१६/प्र.क्र. २२ /नवि-२०
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ जानेवारी, २०१६

परिपत्रक :

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांच्या कलम ४५१ नुसार विवक्षित प्रकरणांमध्ये महानगरपालिकेचा किंवा इतर प्राधिकरणांचा कोणताही ठराव किंवा आदेश निलंबित किंवा विखंडीत करण्याबाबत शासनास अधिकार आहेत.

२. सदर अधिनियमाच्या कलम ४५१ (१) नुसार त्यामध्ये नमूद करण्यात आलेल्या कारणास्तव राज्य शासनास लेखी आदेशाद्वारे संबंधित ठरावाचे किंवा आदेशांचे कार्यान्वयन त्यामध्ये ते विनिर्दिष्ट करील अशा मुदतीसाठी किंवा मुदतींसाठी निलंबित करता येईल किंवा अशी कोणतीही कृती करण्यास मनाई करता येईल व अशा आदेशाची १ प्रत, राज्य शासनाने महानगरपालिकेस व आयुक्तास व परिवहन व्यवस्थापकास ताबडतोब पाठविली पाहिजे, अशी तरतूद आहे.

३. उपरोक्त कलम ४५१ च्या तरतूदींच्या अनुषंगाने कार्यवाहीच्या प्रकरणी शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, कलम ४५१ अनुसार संबंधित महानगरपालिका आयुक्तांकडून प्रस्ताव सादर झाल्यानंतर त्यावर शासन स्तरावर बऱ्याच कालावधीपर्यंत कार्यवाही होत नाही. त्याचप्रमाणे ठरावाचे निलंबन करण्यात आल्यानंतर पोटकलम (२) अनुसार संबंधितांचे निवेदन अभिप्रायासह सादर होणे/ अभिवेदन नसल्यास त्याप्रमाणे अहवाल सादर होणे व तद्नंतर पोट कलम (३) अनुसार ठरावाबाबत शासनाकडून अंतिम आदेश/निर्देश देणे, इत्यादि कार्यवाही होत नाही. त्यामुळे याबाबत न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास / विधानमंडळ विषयक, कामकाजाच्या अनुषंगाने प्रभावीरितीने शासनाची बाजू मांडणे जिकिरीचे होते.

४. उपरोक्त पार्श्वभूमीवर कलम ४५१ खालील प्रकरणी कार्यवाही करताना सर्व महापालिका आयुक्त यांनी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरावी :-

अ) कलम ४५१ (१) खालील आदेश प्रस्ताव सादर झाल्यापासून ३० दिवसांत न झाल्यास संबंधित महानगरपालिका आयुक्त यांनी ही बाब सचिव (नवि-२) यांच्या निदर्शनास आणावी.

ब) कलम ४५१ (१) अनुसार ठराव निलंबित करण्यात आल्यानंतर ती बाब संबंधित प्राधिकरणांच्या नजरेस आणून, त्यासंबंधात प्राधिकरणाने अभिवेदन सादर केल्यास ते आपल्या अभिप्रायासह शासनास सादर करण्याची जबाबदारी महानगरपालिका आयुक्त यांची राहील. संबंधित प्राधिकरणाने अभिवेदन सादर केले नसल्यास महानगरपालिका आयुक्त यांनी त्याप्रमाणे शासनास कळवावे.

क) पोटकलम (१) अनुसार ठराव निलंबित करण्यात आल्यानंतर त्यासंदर्भात आयुक्त यांचेकडून प्रतिवेदनासह अथवा प्रतिवेदनाशिवाय अभिप्राय प्राप्त झाल्यास संबंधित कार्यासनांनी पोटकलम (३) अनुसार निर्गमित करावयाचे आदेश हे आयुक्त यांच्याकडून सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसात निर्गमित करणे आवश्यक आहे.

ड) पोटकलम (३) नुसार निर्गमित करण्यात यावयाचे आदेश विहित मुदतीत निर्गमित न झाल्यास महानगरपालिका आयुक्त यांनी सदरहू बाब सचिव (नवि-२) यांच्या निदर्शनास आणावी.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक २०१६०११५१५४६४४०६२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Jayasingrao N Patil

Digitally signed by Jayasingrao N Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Jayasingrao N Patil
Date: 2016.01.15 15:48:08 +05'30'

(ज.ना.पाटील)
उप सचिव, नगर विकास विभाग

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. सभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
३) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधान सभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
४) मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
६) प्रधान सचिव-१, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७) सचिव-२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८) आयुक्त, सर्व महानगरपालिका
९) आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
१०) सर्व सह सचिव/ उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
११) नगर विकास विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१२) निवडनस्ती (नवि-२०), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई